# Arts and Commerce College, Mayani (Dist. Satara)

# DVV Documents

Criteria 2

**Teaching Learning and Evaluation**

| 2.1.2 |
| --- |
| Percentage of Seats Filled Against Reserved Categories (SC, ST, OBC, etc.) As Per Applicable Reservation Policy for the First-Year Admission During the Last Five Years |

11. Government Resolution Indicating Orphan Reservation

**अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% टक्का समांतर आरक्षण देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अमुजा-२०११/ प्र.क्र. २१२/ का-३,**
**नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**दिनांक - ०२ एप्रिल, २०१८.**

<u>वाचा</u>- शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दिनांक ०६.०६.२०१६.

<u>प्रस्तावना :-</u>

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना पोलीस, स्वयंसेवी संस्था, पालक यांचेकडून बाल कल्याण समितीमार्फत बालगृहात प्रवेश दिला जातो. ० ते १८ वयोगटातील अशा मुलांना बालगृहामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य सुविधा, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी सुविधा पुरविल्या जातात व पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जातात. अनाथ मुलांना त्यांचा संस्थेतील कालावधी संपल्यानंतर संस्थेच्या बाहेर पडल्यानंतर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अनाथ मुलांची जात नक्की माहिती नसल्याने, त्यांना कोणत्या एका विशिष्ट प्रवर्गात समाविष्ट करता येत नाही. जातीचा दाखला नसल्यामुळे, त्यांना विविध शासकीय लाभापासून वंचित रहावे लागते. त्यामुळे त्यांच्या भावी आयुष्यात अनेक अडचणी निर्माण होतात. अनाथ मुलांकडे कोणतीही कागदपत्रे व पुरावे नसल्यामुळे, त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही व त्यामुळे त्यांना विविध शासकीय सवलतींपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा, याकरीता आरक्षण लागू करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनाथ मुलांना शिक्षण व नोकरी यामध्ये १% समांतर आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

<u>शासन निर्णयः-</u>

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभांपासून वंचित रहावे लागते त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे. त्यासाठी खालील अटी व शर्ती निश्चित करण्यात येत आहेत-

१) बालगृहातील व इतर अनाथ मुलांपैकी महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असणा-या मुलांसाठीच हे आरक्षण लागू राहील. ज्या मुलांच्या कागदपत्रावर कोणत्याही जातीचा उल्लेख नाही व ज्याचे आईवडील, काका-काकू, आजी-आजोबा व चुलत भावंडे व इतर नातेवाईक यापैकी कोणाबाबतही माहिती उपलब्ध नाही, अशा मुलांनाच अनाथ आरक्षण लागू राहील.

२) तसेच ज्या मुलांचे आई वडिल हयात नसून त्यांचेकडे जातीचे प्रमाणपत्र नाही, अशा मुलांच्या बाबतीत त्यांनी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक राहील. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून संबंधित जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीकडे सदर अर्ज पाठविण्यात येईल. बाल कल्याण समितीकडून सदर अर्जाची तपासणी करण्यात येईल व आवश्यकतेनुसार पोलीस / महसूल विभागाच्या यंत्रणेकडून छाननी करुन तसेच मुलाखत घेऊन अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ४० दिवसात आपली शिफारस संबंधित विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल. बाल कल्याण समितीची शिफारस विचारात घेऊन विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडून अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच शिफारस अमान्य करण्यात येऊन अनाथ प्रमाणपत्र नाकारण्यात आल्यास विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास यांचेकडून कारणासहित सदर अर्ज बाल कल्याण समितीकडे परत पाठविण्यात येईल. प्रमाणपत्राच्या अनुषंगाने जर कांही तक्रार असल्यास यासंदर्भात अपिलीय प्राधिकारी हे आयुक्त, महिला व बाल विकास हे राहतील.

३) उपरोक्त वाचा मधील दिनांक ०६.०६.२०१६ च्या शासन निर्णयानुसार महिला व बाल विकास विभागामार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत मान्यता प्राप्त (अनुदानित/विनाअनुदानित) संस्थामध्ये दाखल मुलांना अनाथ प्रमाणपत्र देणेबाबतची कार्यवाही विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

४) सदर निर्णय, शासन निर्णय लागू झाल्याच्या दिनांकापासून पुढे होणा-या सरळसेवा भरतीसाठी लागू राहील.

५) शासन सेवेत प्रवेशासाठी अनाथ मुलांसाठी खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण गट " अ" ते "ड"च्या सर्व पदावर लागू राहील.

६) सदर आरक्षणाची गणना पद भरती करण्यात येणा-या रिक्त पदावर करण्यात यावी.

७) संबंधित भरती वर्षात अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी.

८) त्याचप्रमाणे शिक्षणांतर्गत शिष्यवृत्ती, वसतिगृह व व्यावसायिक शिक्षणांतर्गत शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेमध्ये सदर आरक्षण लागू राहील.

९) अनाथ आरक्षण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एखाद्या मुलाची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास त्याने सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची फेरतपासणी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या मार्फत करणे आवश्यक राहील.

१०) अनाथ आरक्षणाबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

११) अनाथ आरक्षणाच्या लाभाच्या अनुषंगाने काही समस्या उद्भवल्यास त्याबाबत अभिनिर्णय घेण्याचा अधिकार शासनास राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०२१३०९१३८०३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandhya Sudhir Gawas

Digitally signed by Sandhya Sudhir Gawas
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9af004e92d57921adf37df245e6a4d654bc630fcd0b0e13d1dd766b546c90f61, serialNumber=bfcea34b3e67580078284e564299f1fb5f9606206bcc59992327334b4690771c, cn=Sandhya Sudhir Gawas
Date: 2018.04.02 13:11:50 +05'30'

**( सं.सु.गवस )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
२. सर्व मंत्रालयीन विभाग
३. संचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.
५. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे.
६. सर्व उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी,
८. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
९. निवड नस्ती / का-३